# अहवाल शैक्षणिक वर्ष सन 2024- 25

## राज्यशास्त्र विभाग

आपल्या महाविद्यालयात कला शाखेत प्रथम,द्वितीय आणि तृतीय वर्षाला राज्यशास्त्र स्पेशल विषय आहे. राज्यशास्त्र विभागात प्राध्यापक श्री. हारदे सी.जी.(विभाग प्रमुख) व प्राध्यापक खरात ए.एन.हे अध्यापनाचे काम करतात. राज्यशास्त्र विभागात प्रथम वर्ष कला एकूण विद्यार्थी -77, द्वितीय वर्ष - 34, तृतीय वर्ष -17 विद्यार्थी तसेच प्रथम वर्ष वाणिज्य - 40 व प्रथम वर्ष विज्ञान - 01 विद्यार्थी अध्ययन करत होते.

राज्यशास्त्र विभागातील प्राध्यापक हारदे सी.जी.व प्राध्यापक अमोल खरात सर यांनी विविध महाविद्यालयांच्या चर्चासत्र व परीक्षा यामध्ये सहभाग घेतला आहे. महाविद्यालयात दि. 26 नोव्हेंबर 2024 रोजी संविधान दिन साजरा केला व संविधानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. राज्यशास्त्र विभागाअंतर्गत दि. 10 डिसेंबर 2024 रोजी मानवी हक्क दिन साजरा केला.

राज्यशास्त्र विभाग अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, प्रश्नमंजुषा इत्यादी कार्यक्रम घेतले जातात. राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांचे विविध शैक्षणिक क्रेडिट पूर्ण करण्यासाठी वेरुळ लेणी, देवगिरी किल्ला, जायकवाडी धरण (जि.- छत्रपती संभाजी नगर ) येथे अभ्यास भेट दिली.

प्रा. हारदे सी.जी.

विभाग प्रमुख

Scanned by CamScanner